(१)

M T W T F S S
Page No.:
Date:
YOUVA

# नोबेल - पुरस्कार.

त्या दिवशी पेपरमधे मिखाईल गोर्बाचेव्ह सोवियत युनियनचे पूर्वाध्यक्ष यांच्या निधनाची बातमी वाचली. त्यांच्याबद्दल त्यांच्या कार्यकर्तृत्वा बद्दल बरंच वाचण्यात आले. त्यातली एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात राहिली. ती म्हणजे त्यांना १९९० चा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला होता.

मग काय माझ्या डोक्यात त्या पुरस्काराचेच विचार रिंगण घालू लागले. हे पुरस्कार कोणी, कधी कोणकोणत्या विषयांत दिले जातात? ते का कसे सुरु झाले वगैरे वगैरे प्रश्न उभे राहिले.

नोबेल पुरस्कार हा जगातील सर्वात प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. जगभरातील कोणत्याही देशातील काना कोपऱ्यातून पुरस्कारार्थी निवडले जातात.

हे पारितोषिक डॉ. आल्फ्रेड नोबेल यांच्या स्मरणार्थ सुरु झाला.

डॉ. आल्फ्रेड नोबेल हे स्वीडिश शास्त्रज्ञ. त्यांचा जन्म २१ ऑक्टो. १८३३ ला स्वीडनमधील स्टॉकहोम येथे झाला. त्यांचे वडील इमॅन्युएल नोबेल हे पेशाने इंजिनियर व संशोधक होते. आल्फ्रेड रशिया मधे लहानाचे मोठे झाले. फ्रान्स आणि अमेरिकेत त्यांनी रसायन आणि तंत्रज्ञानाचं शिक्षण घेतलं. त्यांना रशियन, फ्रेंच, इंग्लीश, जर्मन अशा विविध भाषा अवगत होत्या. सामाजिक घडामोडी, शांतता या विषयांची त्यांना आवड होती. मुख्य म्हणजे त्यांनीच "डायनामाईट"चा शोध लावला. पण पुढे युद्धात डायनामाईट मुळे फार मोठा विनाश झाला. त्यामुळे ते विमनस्क झाले, आणि त्यांनी आपल्या संपत्तीचा वापर मानव हितासाठी करण्याचे ठरविले. मृत्युपत्राद्वारे ३६.५ कोटी डॉलर्सची संपत्ति पुरस्कार स्थापन करण्यासाठी दिली. पण या गोष्टीला त्यांच्या कुटुंबियांचा विरोध होता. त्यांचा मृत्यु १० डिसें. १८९६ ला इटलीतील सॅन रेमो येथे झाला. पण विरोधामुळे पुरस्कार लगेच सुरु झाले नाहीत

(2).

M T W T F S S
Page No.:
Date:
YOUVA

५ वर्षांनी १९०१ मध्ये पुरस्कार सुरु झाले. पुरस्कार विजेत्यांना Laureates म्हटलं जातं.

दरवर्षी हे पुरस्कार नोबेल फाऊंडेशन तर्फे दिले जातात वेगवेगळ्या समित्या स्थापन केल्या आहेत. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ति व सामाजिक संस्थांना हा पुरस्कार दिला जातो.

शांतता, साहित्य, भौतिकी, रसायन, वैधकीय विज्ञान, अर्थशास्त्र इत्यादी विषयांसाठी हा पुरस्कार दिला जातो. पुरस्कार स्वरुपात प्रशस्ति पत्राबरोबर १० लाख डॉलर्स ची रक्कम दिली जाते.

1) भौतिकीचा प्रथम पुरस्कार — विल्हेम कॉनरॉड रोन्ट्झेन.
2) रसायन " " — जेकोबस हेनिक्स व्हॅट.
3) वैद्यक " " — एमिल फॉन बेहरिंग.
४) साहित्य - " " — सुली प्रुधोम.
5) शांतता " " — हेन्री ड्युनंट.

अर्थशास्त्राचा पुरस्कार त्यानंतर सुरु झाला.
डिसेंबर 2020 पर्यंत ९५४ व्यक्तिंना आणि २५ संस्थांना पुरस्कार देण्यात आले.

सर्वात लहान पुरस्कार विजेती - शांतता - मलाला युसुफ जाई.

आतापर्यंत १० भारतीयांना नोबेल पुरस्कार प्राप्त झाले आहेत

नोबेल पुरस्कार मिळविणारे पहिले भारतीय
1) रवींद्र नाथ टागोर — साहित्य.
2) सी. व्ही. रमण — भौतिकी.
3) मदर तेरेसा — शांतता.
४) अमर्त्य सेन —
५) कैलाश सत्यार्थी — शांतता.
६) राजेंद्र पचौरी —
७) हर गोविंद खुराणा —
८) सुब्रह्मण्यम चंद्रशेखर —
९) वेंकटरामन रामकृष्णन —
१०) अभिजित बॅनर्जी.




(3)

M T W T F S S
Page No.: YOUVA
Date:

हा पुरस्कार मिळविणारे प्रथम भारतीय व्यक्ति रविंद्रनाथ टागोर. ते भारतातीलच नाही तर आशियातील प्रथम पुरस्कार प्राप्त व्यक्ति होते. त्यांचे बरेच साहित्य प्रसिद्ध आहे. त्यापैकी "गीतांजली" या त्यांच्या काव्य रचनेला नोबेल पुरस्कार देऊन त्यांना सम्मानित करण्यात आले.

त्यांच्या बद्दल लिहायला खूप आहे पण विषयांतर होईल. तेव्हा इथेच थांबते.



Mother Teresa, Rabindranath Tagore and Amartya Sen. (Photo credits: Twitter/@IndianHistorypic, Creative Commons)

आशा पावगी.
"आनंद बन"
B-10.
वृंदावन-कॉम्प्लेक्स
कोथरुड-पुणे.

